## नियमित कार्यक्रम

श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल कला महिला महाविद्यालय भंडारा राष्ट्रीय सेवा योजना सन २०१९-२० नियमित कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे -

राष्ट्रीय सेवा योजना विभाग सन २०१९-२० साठी १०० विद्यार्थीनींचा संख्या रा. तु. म. नागपूर विद्यापीठातर्फे निश्चित करण्यात आली. स्वयंसेविकांची संख्या १५३ विद्यापीठामध्ये नोंदणी करण्यात आली. या २०१९-२० या सत्रामध्ये नियमित कार्यक्रमांचे आयोजन पुढीलप्रमाण करण्यात आले.

### २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन :-

जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, नेहरू युवा केंद्र जे. एम. पटेल महाविद्यालय श्रीमती आर. एम. पटेल महाविद्यालय, पतंजली योग समिती यांचे संयुक्त विद्यमाने जे. एम. पटेल पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, जिल्हा क्रिडा अधिकारी प्रशांत दोंदले, पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी रत्नाकर तिडके, नेहरू युवा केंद्र रमेश अहिरकर, डॉ. भगवान मस्के, प्राचार्य रंजना श्रृंगारपुरे, श्रीमती रेवाबेन पटेल महाविद्यालय, भंडारा प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी विविध आसनांचा योगाभ्यास करण्यात आला व योगाप्रती जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार क्रिडा अधिकारी ए. बी. मरस्कोले यांनी मानले. या कार्यक्रमाला श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### ५ जुलै २०१९ - वृक्षारोपण कार्यक्रम :-

श्रीमती रेवाबेन मनोहर पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे दि. ५ जुलै २०१९ ला वृक्षारोपण घेण्यात आला.

राज्यशासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम योजनेअंतर्गत श्रीमती आर. एम. पटेल महाविद्यालय येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन रा. से. यो. विभाग व आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने करण्यात आला. महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. गोवर्धन

Scanned with CamScanner

धोटे, प्रा. डॉ. शिरीष नखाते, कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण ५० झाडे लावण्यात आली.

११ जुलै २०१९ - तंबाखू व्यसनमुक्ती कार्यक्रम :-

दि. ११ जुलै २०१९ ला श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला महाविद्यालयात तंबाखू व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोवर्धन धोटे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिरिष नखाते, डॉ. चंद्रशेखर शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी देशामध्ये दरवर्षी जवळपास ३०००० लोक तंबाखू सेवनामुळे मृत्यमुखी पडत असतात. शहरी व ग्रामीण शाळकरी मुलांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा वेळेस मुलांना तंबाखूमुक्त करणे काळाची गरज आहे. असे प्रतिपादन डॉ. शिरिष नखाते यांनी केले. प्रास्ताविक डॉ. राहुल भोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. श्वेता वेगड यांनी केले. संचालन प्रा. नरेश बोरकर, आजीवन अध्ययन व विस्तार प्रमुख यांनी केले.

१५ जुलै २०१९ वृक्षारोपण कार्यक्रम :-

राज्यशासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम अंतर्गत श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन रा. से. यो. विभाग व आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने करण्यात आले.

महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमात सुरुवात प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. धोटे, प्रा. डॉ. शिरिष नखाते, प्रा. डॉ. राहुल भोरे, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे उपस्थित होते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर वृक्ष संवर्धन सुद्धा करावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन आजीवन अध्ययन विभाग प्रमुख प्रा. नरेश बोरकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन रा. से. यो. सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता वेगड यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थीनींच्या हस्ते ५० वृक्षांची लागवड करण्यात आली.

Scanned with CamScanner

## ५ सप्टेंबर - शिक्षक दिन साजरा :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर ''शिक्षक दिन'' म्हणून साजरा करण्यात आला. यात शिक्षकांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य रंजना श्रृंगारपुरे ह्या होत्या. या प्रसंगी महाविद्यालयातील आचार्य पदवीप्राप्त प्रा. डॉ. राहुल भोरे व प्रा. डॉ. श्वेता वेगड संगीत विभाग यांचा शाल, श्रीफळ देवून प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थीनींनी भेटवस्तु देवून प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे, प्रा. डॉ. मधुलता व्यास, प्रा. डॉ. गोवर्धन धोटे, प्रा. डॉ. कैलास ईश्वरकर, प्रा. डॉ. चंद्रशेखर शर्मा, प्रा. डॉ. राहुल भोरे, प्रा. नरेश बोरकर कु. वर्षा मेश्राम, प्रा. ज्ञानेश घरडे, प्रा. डॉ. बागडे, प्रा. धुर्वे, प्रा. नंदेश्वर यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांनी अध्यक्षीय भाषणातून प्राध्यापकांनी अभ्यासपूर्ण आत्मचिंतनशील अध्यापन करावे तसेच विद्यार्थ्यांचे परिपूर्ण व्यक्तीत्व घडविणारा नवीन आव्हाने सांगणारा पालक असावे असे मत व्यक्त केले. यावेळी कु. शिल्पा जगनाडे, प्रिती भेदे, जेसिका मेश्राम, वैष्णवी सोनटक्के, कु. करिश्मा खंडाते यांनी आपल्या भाषणातून गुरुबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. प्रणाली खोब्रागडे, प्राजक्ता राघोर्ते, पल्लवी बारई, स्वाती पडोळे, दिक्षा रामटेके, स्नेहा शेल्लारे, लक्ष्मी देवतारे, स्वाती बडवाईक, शितल बांडे, सपना वनवे यांनी अथक परिश्रम केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, संचालन कु. आचल कामथे तर आभार प्रदर्शन कु. आरती हेडाऊ हिने केले. कार्यक्रमाला रा. से. यो. च्या बहुसंख्य स्वयंसेविका उपस्थित होत्या.

## २४ सप्टेंबर 'रा. से. यो. स्थापना दिन' साजरा :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवायोजना स्थापना दिन या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे या उद्देशाने करण्यात आले.

Scanned with CamScanner

वरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांनी भुषविले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिरिष नखाते, प्रा. किशोरदत्त पाखमोडे, प्रा. डॉ. श्वेता वेगड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तैलचित्राला पाहुण्यांच्या हस्ते माल्यार्पण करुन करण्यात आले. याचबरोबर ''या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...'' विद्यापीठ गीत गायन करण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांनी अध्यक्षीय भाषणात असे प्रतिपादन केले की, राष्ट्रीय सेवा योजनामुळे स्वयंसेविकांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होतो. सामाजिक समस्यांची जाणीव होते आणि स्वयंसेवकांनी समाजसेवेतून व्यक्तित्वाचा विकास करावा या प्रसंगी प्रा. डॉ. शिरिष नखाते, कु. शिल्पा जगनाडे, कु. आरती हेडावू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. निवडणुक मतदान जागृतीसाठी महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी पथनाट्याचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, संचालन कु. श्रद्धा खोब्रागडे तर आभार प्रदर्शन कु. आचल कामथे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कु. स्वार्थी बडवाईक, प्रतिज्ञा बांते, कांचन झंझाड, पल्लवी दमाहे,स्नेहा शेलारे, कोमल राखडे, कु. दुर्गा गाढवे, माधुरी हाडगे, कोमल ढोमणे, काजल सोनटक्के यांनी प्रयत्न केले.

२५ सप्टेंबर मतदान जनजागृती कार्यक्रम :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ अंतर्गत मतदारामध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी या उद्देशाने कार्यक्रम घेण्यात आले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी मा. डॉ. नरेश गीते उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पाचाळ, जिल्हा खनिज अधिकारी सुरेश नैताम, तहसिलदा अक्षय पोयाम, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा साबळे, प्रा. डॉ. राहुल भोरे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन रा. से. यो. अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे यांनी केले. कार्यक्रमासाठी नायब तहसिलदार अनिता गावंडे, वैभव कोलते, विक्रम फडके, प्रणाली खोब्रागडे, श्रद्धा खोब्रागडे निकीता कोडवते यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner

१ ऑक्टोबर अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रम :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालयात रा. से. यो व आजीवन अध्ययन विभाग यांच्या वतीने अंधश्रद्धा निर्मुलन कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मधुलता व्यास होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय अं.नि.स. चे जिल्हा सचिव मुलचंद कुकडे, जिल्हा उपाध्यक्ष रत्नाकर तिडके उपस्थित होते. ''अंधश्रद्धा एक सामाजिक संस्था या विषयावर मुलचंद कुकडे आणि आपले चिकित्सक बुद्धी प्रामाण्यवादी विचार मांडले. श्री. तिडके यांनी प्रात्यक्षिकाव्दारे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे यांनी केले. आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता वेगड यांनी मानले.

२ ऑक्टोबर ''जागतिक अहिंसा दिन'' व रा.से.यो. सप्ताह :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा येथे २ ऑक्टो. राष्ट्रपिता म. गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली व रा.से.यो. सप्ताह साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिरिष नखाते, कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता वेगड उपस्थित होते. या प्रसंगी शिल्पा जगनाडे, श्रद्धा खोब्रागडे, संजना टेंभुर्णे, आचल कामथे, स्वार्थी बडवाईक यांनी महात्मा गांधी व शास्त्रीजींच्या जीवनावर आधारीत भाषणे दिलीत. रा.से.यो. सप्ताहाच्या निमित्ताने महाविद्यालयात स्वच्छता अभियान प्रबोधनात्मक पथनाट्य दाखविण्यात आली. दि. २५ सप्टेंबरला महात्मा गांधी व्यक्ती आणि विचार यावर परिसंवाद घेण्यात आला. दि. २८ सप्टेंबरला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सामाजिक विचार यावर व्याख्यान घेण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. गोवर्धन धोटे अध्यक्षस्थानी होते. दि. १ ऑक्टोंबरला ''तरुणांची वाढती व्यसनाधीनता'' या विषयावर व्याखान घेण्यात आले. दि. २ ऑक्टोंबर ''जागतिक अहिंसा दिन'' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत प्रबोधनात्मक रॅली काढण्यात आली. यावेळी विधानसभा निवडणुक, प्लास्टीक निर्मुलन, स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले.

Scanned with CamScanner

१८ जानेवारी २०२० फीट इंडिया सायक्लोन मेमोंट कार्यक्रम :-

श्रीमती रेवाबेन मनोहरभााई पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथो फीट इंडिया सायक्लोन मोमेंट कार्यक्रम घोणयात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य मा. रंजना शंगारपुरे यांच्या मार्गदर्शानाखाली घोणयात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालय परिसरामधये प्रबोधानात्मक रॅली काढण्यात आली. यावेळी प्रा. बोरकर प्रा. डॉ. राहुल भोरे, प्रा. घरडे, प्रा. आरती देशापांडे, प्रा आरती देशापांडे, प्रा. डॉ. अनिता जयस्वाल उपस्थित होते.

२३ जानेवारी २०२० एच आय व्ही जनजागती व रेड बिन क्लबचे उद्‌घाटन.

श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महाविद्यालय व सामान्य रुग्णालय भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने युवा वर्गात एच.आय.व्ही. जनजागती व्हावी या करीता कार्यक्रम घेण्यात आला.

वरील कार्यक्रम महविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंजना शंगारपूरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. अध्यक्षास्थानी सामान्य रुग्णालय भंडाराचे आय. सी. टी. सी. समुपेदशाक सुरेश ठाकरे होते यावेळी समुपदेशक रतना भुजाडे सिकलसेल विभागतील चंदा शेंडे उपस्थित होते. यात मान्यवरांच्या हस्ते एड्‌स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार रेडरिबन क्लबचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी या क्लबचे ध्येय व उद्दिष्टये व कार्य व जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सुरेश ठाकरे यांनी युवा वर्गानी एच.आय.व्ही. तपासणी केली पाहिजे तसेच समाजामध्ये जनजागृती करावी असे प्रतिपादन केले तसेच अन्य मान्यवरांनी या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज येरणे यांनी केले तर संचालन प्रा.डॉ. श्वेता वेगड तर आभारप्रदर्शन प्रा. नरेश बोरकर यांनी केले. प्रश्नोत्तर कार्यक्रमात महाविद्यालयातील गायत्री ठाकरे, रागीनी धाकाते, उमा मेंढे, प्राची बांते, नेहा कटारे, प्रणाली साखारकर, नेहा कुंभारे, निशा जुमळे आदींनी सहभाग घेतला.

२४ जानेवारी २०२० राष्ट्रीय मतदार दिन व राष्ट्रीय बालीका दिवस संपन्न :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे राष्ट्रीय मतदान दिन व राष्ट्रीय बालीका दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांनी भुषविले. या कार्यक्रमाचे संचालन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता वेगड यांनी केले. प्रास्ताविक प्रा. आरती देशपांडे यांनी केले. यात

Scanned with CamScanner

राष्ट्रीय मतदान दिनाचे व राष्ट्रीय बालीका दिवसाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. डॉ. राहुल भोरे, कु. वर्षा मेश्रा, प्रा. नरेश बोरकर, प्रा. डॉ. गोवर्धन धोटे, प्रा. डॉ. शिरिष नखाते उपस्थित होते. या दिवशी राष्ट्रीय मतदार दिन निमित्त शपथ घेण्यात आली. मान्यवरांचे आभार कु. शिल्पा जगनाडे हिने केले.

८ मार्च २०२० जागतिक महिला दिन संपन्न :-

श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे जागतिक महिला दिन संपन्न करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता वेगड यांनी भुषविले. व्यासपीठावर प्रा. आरती देशपांडे, प्रा. डॉ. अनिता जयस्वाल, प्रा. सुनिता शेंडे, कु. वर्षा मेश्राम उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे औचित्य साधून जागतिक महिला दिन या विषयावर रागिनी धकाते, करूणा सावतवान, प्रणाली खोब्रागडे, आरती हेडाऊ यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रणाली साखरकर, शिल्पा जगनाडे, हर्षा झंझाड, प्रतिक्षा बांते, श्रृतिका खोब्रागडे, पायल मते यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner

धमकी दिली. होते.

# ५ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## योगाप्रती जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न, शिबिरात २८ योग व प्राणायामांचा अभ्यास

भंडारा:– जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, जे.एम. पटेल महाविद्यालय, पतंजली योग समिती, आयएनओ, जिल्हा योग संघटना तसेच जिल्हयातील विविध सामाजिक संघटना यांचे संयुक्त विदयमानाने जे.एम. पटेल महाविदयालय भंडारा येथे आज सकाळी ५.३० वाजता ५ वा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा सोहळा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी शांतनू गोयल यांनी केले. प्रमुख अतिथी जे.एम. पटेल महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. विकास ढोमणे, जिल्हा क्रिडा अधिकारी प्रशांत दोंदले, भारत स्वाभिमान न्यासचे जिल्हा प्रभारी रामविलास सारडा, पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी रत्नाकर तिडके,



द्विपप्रज्वलन करतांना जिल्हाधिकारी गोयल व उपस्थित मान्यवर

नेहरू युवा केंद्र रमेश अहिरकर, आयएनओ समन्वयक डॉ. भगवान मस्के, डॉ. कार्तिक पन्नीकर, डॉ. राजेंद्र शाह, डॉ. भिमराव पवार, डॉ. प्रशांत मानुसमारे, प्राध्यापक रूपेश मोहतूरे, तसेच जिल्हाधिकारी शांतनू गोयन यांचा संपूर्ण परिवार प्रामुख्याने उपस्थित होता.

यावेळी वृक्षारोप देवून पाहूण्यांचे स्वागत करण्यात आले. डॉ. रमेश खोब्रागडे, कांचन ठाकरे, स्नेहल तिडके, भोजराम झंझाड योगाचे मास्टर्स ट्रेनर यांच्या मार्गदर्शनात यो प्रात्याक्षित करून दाखविण्यात आले. जिल्हाधिकारी शांतनू गोयल यांचे हस्ते त्यांचा वृक्ष देवून सत्कार करण्यात आला. योगमय वातावरण आयोजीत योग दिनाच्या कार्यक्रमात जिल्हयातील सरासरी १ हजार नागरिकांनी सहभाग नोंदवून योग विषयक माहिती जाणून घेतली.

यावेळी विविध आसनांचा योगाभ्यास करण्यात आला. यावेळी संत शिवराम विदयालय भंडारा यांचे मार्फत योगावर आधारीत गित सादर करण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त क्रिडा विभागांतर्गत जिल्हयातील तालुका क्रिडा संकुल लाखांदूर, लाखनी, साकोली, पवनी, तुमसर व मोहाडी येथील जि.प. हायस्कूल मोहाडी येथे योग दिनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार क्रिडा अधिकारी ए.बी. मरस्कोल्हे यांनी मानले. कार्यक्रमासाठी क्रिडा अधिकारी महेश पडोळे, राज्य क्रिडा मार्गदर्शक भोजराम चौधरी, मंगेश गुडघे, तसेच जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पतंजली योग समिती, आयएनओ, जे.एम. पटेल महाविदयालय, रेवाबेन पटेल महाविदयालयाचे सर्व कर्मचारी, नेहरू युवा केंद्र, पोलीस विभाग, संबंधित समित्यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

लोकमत शनिवार, दि. १३ जुलै २०१९ २

# पटेल महाविद्यालयात व्यसनमुक्तीवर जागृती



व्यसनमुक्तीची शपथ घेताना शिक्षकगण.

लोकमत न्यूज नेटवर्क

भंडारा : येथील आर.एम. पटेल महिला महाविद्यालयात तंबाखू व्यसनमुक्तीसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ घेण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोवर्धन धोटे होते. प्रमुख पहुणे म्हणून शिरिष नखाते, चंद्रशेखर शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी देशामध्ये दरवर्षी जवळपास ३० हजार लोक तंबाखू सेवनामुळे मृत्युमुखी पडत असतात. शहरी व ग्रामीण शाळकरी मुलांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे, अशा वेळेस मुलांना तंबाखूमुक्त करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. शिरिष नखाते यांनी केले. कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

प्रास्ताविक डॉ. राहुल भोरे आभार प्रदर्शन श्वेता वेराड, रासेयो संचालक नरेश बोरकर आजिवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख यांनी केले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहण्याचा निश्चय केला.

Scanned with CamScanner

दि. १४ जुलै २०१९

मराठी दैनिक
लोकजन

## पटेल महाविद्यालयात व्यसनमुक्तीवर जागृती



भंडारा:- येथील आर.एम.पटेल महिला महाविद्यालयात तंबाखू व्यसनमुक्तीसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यसनमुक्तीची सामुहिक शपथ घेण्यात आली.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोवर्धन धोटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिरीष नखाते, चंद्रशेखर शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी देशामध्ये दरवर्षी जवळपास ३० हजार लोक तंबाखू सेवनामुळे मृत्यूमुखी पडत असतात. शहरी व ग्रामीण शाळकरी मुलांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे, अशा वेळेस मुलांना तंबाखूमुक्त करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. शिरीष नखाते यांनी केले. कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

प्रास्ताविक डॉ. राहुल भोरे आभार प्रदर्शन श्वेता वेराड, रासेयो संचालक नरेश बोरकर आजिवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख यांनी केले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहण्याचा निश्चय केला.

Scanned with CamScanner

दि. २६।९।१९

मराठी दैनिक
लोकजन

# स्वयंसेवकांनी समाजसेवेतून व्यक्तित्वाचा विकास करावा

## प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे, श्रीमती आर. एम. पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे रा. से. यो. स्थापना दिन साजरा




भंडारा :– स्थानिक श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे या उद्देशाने करण्यात आले.

वरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांनी भूषविले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिरीष नखाते, प्रा. किशोरदत्त पाखमोडे, प्रा. डॉ. श्वेता वेगड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तैलचित्राला पाहुण्यांचे हस्ते माल्यार्पण करुन करण्यात आली. याच बरोबर या भारतात बंधुभाव नित्य वसु दे हे विद्यापीठ गीत गायन करण्यात आले. प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांनी अध्यक्षीय भाषणात असे प्रतिपादन केले की, राष्ट्रीय सेवा योजना मुळे स्वयंसेवकांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास होतो. सामाजिक सदस्यांची जाणीव होते आणि स्वयंसेवकांनी समाजसेवेतून व्यक्तिमत्वाचा विकास करावा. याप्रसंगी प्रा. डॉ. शिरीष नखाते, कु. शिल्पा जगनाडे, कु. आरती हेडावू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. निवडणूक मतदान जागृतीसाठी महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी पथनाट्यांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, संचालन कु. श्रद्धा खोब्रागडे, तर आभार प्रदर्शन कु. आचल कामथे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कु. स्वार्थी बडवाईक, प्रतिज्ञा बांते, कांचन झंझाड, पल्लवी दमाहे, स्नेहा शेलारे, कोमल, कु. दुर्गा गाढवे, माधुरी हाडगे, कोमल ढोमणे, काजल सोनटक्के यांनी प्रयत्न केले.

Scanned with CamScanner

# आर.एम.पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे वृक्षारोपण




**भंडारा:–** राज्य शासनाच्या ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम योजनेंतर्गत श्रीमती आर.एम.पटेल महाविद्यालय भंडारा येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन रासेयो व आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने करण्यात आले.

महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. गोवर्धन धोटे, प्रा. डॉ. शिरिष नखाते, प्रा. डॉ. राहुल भोरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोर पाखमोडे उपस्थित होते.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लावगड करणे काळाजी गरज आहे. त्याचबरोबर वृक्ष संवर्धन सुद्धा करावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन आजीवन अध्ययन विभाग प्रमुख प्रा. नरेश बोरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता वेगड यांनी केले. याप्रसंगी रासेयो च्या विद्यार्थीनींच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले.

१६ जुलै २०१९

# पटेल महाविद्यालयात शिक्षक दिन

**प्रतिनिधी / १७ सप्टेंबर**

**भंडारा :** आर.एम.पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.

यात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.रंजना शृंगारपूरे ह्या होत्या. या प्रसंगी प्रा.डॉ.राहुल भोरे व प्रा.डॉ.श्वेता वेगड यांचा शाल, श्रीफळ देवून प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी भेटवस्तू देवून प्राचार्या डॉ.रंजना शृंगारपूरे, प्रा.मधुलता व्यास, प्रा.गोवर्धन थोटे, प्रा.कैलाश ईश्वरकर, प्रा.चंद्रशेखर शर्मा, प्रा.डॉ.राहुल भोरे, प्रा.नरेश बोरकर, वर्षा मेश्राम, प्रा.ज्ञानेश घरडे, प्रा.बागडे, प्रा.धुर्वे, प्रा.नंदेश्वर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रणाली खोब्रागडे, प्राजक्ता राघोर्ते, पल्लवी बारई, स्वाती पडोळे, दिक्षा रामटेके, स्नेहा सेलारे, लक्ष्मी देवतारे, स्वाती बडवाईक, शीतल बांडे, सपना वनवे इ.उपस्थित होते. प्रास्ताविक किशोरदत्त पाखमोडे तर संचालन आचल कामथे, आभार आरती हेडावू हिने केले.

Scanned with CamScanner

१८।९।२०१९

देशोन्नती भंडारा

# पटेल महाविद्यालयात शिक्षक दिन

**प्रतिनिधी / १७ सप्टेंबर**

**भंडारा :** आर.एम.पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.

यात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ.रंजना शृंगारपूरे ह्या होत्या. या प्रसंगी प्रा.डॉ.राहुल मोरे व प्रा.डॉ.श्वेता वेगड यांचा शाल, श्रीफळ देवून प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी भेटवस्तू देवून प्राचार्या डॉ.रंजना शृंगारपूरे, प्रा.मधुलता व्यास, प्रा.गोवर्धन थोटे, प्रा.कैलाश ईश्वरकर, प्रा.चंद्रशेखर शर्मा, प्रा.डॉ.राहुल मोरे, प्रा.नरेश बोरकर, वर्षा मेश्राम, प्रा.ज्ञानेश घरडे, प्रा.बागडे, प्रा.धुर्वे, प्रा.नंदेश्वर यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रणाली खोब्रागडे, प्राजक्ता राघोर्ते, पल्लवी बारई, स्वाती पडोळे, दिक्षा रामटेके, स्नेहा सेलारे, लक्ष्मी देवतारे, स्वाती बडवाईक, शीतल बांडे, सपना वनवे इ.उपस्थित होते. प्रास्ताविक किशोरदत्त पाखमोडे तर संचालन आचल कामथे, आभार आरती हेडावू हिने केले.

Scanned with CamScanner

# स्वयंसेवकांनी समाजसेवेतून व्यक्तित्वाचा विकास करावा

## प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे, श्रीमती आर. एम. पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे रा. से. यो. स्थापना दिन साजरा




भंडारा :– स्थानिक श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे या उद्देशाने करण्यात आले.

वरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांनी भूषविले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिरीष नखाते, प्रा. किशोरदत्त पाखमोडे, प्रा. डॉ. श्वेता वेगड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तैलचित्राला पाहुण्यांचे हस्ते माल्यार्पण करुन करण्यात आली. याच बरोबर या भारतात बंधुभाव नित्य वसु दे हे विद्यापीठ गीत गायन करण्यात आले. प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांनी अध्यक्षीय भाषणात असे प्रतिपादन केले की, राष्ट्रीय सेवा योजना मुळे स्वयंसेवकांचा सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास होतो. सामाजिक सदस्यांची जाणीव होते आणि स्वयंसेवकांनी समाजसेवेतून व्यक्तिमत्वाचा विकास करावा. याप्रसंगी प्रा. डॉ. शिरीष नखाते, कु. शिल्पा जगनाडे, कु. आरती हेडावू यांनी आपले मनोगत व्यक्त केले. निवडणूक मतदान जागृतीसाठी महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी पथनाट्यांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, संचालन कु. श्रद्धा खोब्रागडे, तर आभार प्रदर्शन कु. आचल कामथे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कु. स्वार्थी बडवाईक, प्रतिज्ञा बांते, कांचन झंझाड, पल्लवी दमाहे, स्नेहा शेलारे, कोमल, कु. दुर्गा गाढवे, माधुरी हाडगे, कोमल ढोमणे, काजल सोनटक्के यांनी प्रयत्न केले.

Scanned with CamScanner

# मतदान जनजागृती कार्यक्रम

## मार्गदर्शन : रेवाबेन पटेल महाविद्यालयात उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

भंडारा : आर. एम. पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे भंडारा विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ अंतर्गत मतदारांमध्ये व्यापक प्रमाणात जनजागृती व्हावी या उद्देशाने कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. नरेश गीते उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हा खनिकर्म अधिकारी सुरेश नैताम, तहसीलदार अक्षय पोयाम, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा सावळे, जिल्हा माहिती अधिकारी प्रा. डॉ. राहुल भोरे आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

यांप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. नरेश गीते जिल्हाधिकारी



मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ.गिते.

भंडारा यांनी लोकशाहीत नागरिकांचा सहभाग आवश्यक असून मतदानाच्या स्वरुपात आपल्याला नोंदवायचा आहे. यासाठी तरुणांनी उज्वल भविष्याचा विचार करुन मतदान करावे व मतदानाचा हक्क बजवावा असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून ईव्हीएम मशिनचे मतदान करुन प्रात्याक्षिक दाखविले. यासोबत मतदान जागृती करण्यासाठी नुतन कन्या विद्यालय भंडारा येथील विद्यार्थीनी तसेच असर फाऊंडेशन भंडारा यांच्यावतीने महाविद्यालयात पथनाट्य दाखविण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन रासेयो अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्वेता बेगड यांनी केले. कार्यक्रमासाठी नायब तहसीलदार अनिता गावंडे, वैभव कोलते, विक्रम फडके, प्रणाली खोब्रागडे, श्रध्दा खोब्रागडे, प्राची बुराडे, नेहा कुंभारे, निकीता कोडवते यांनी सहकार्य केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

Scanned with CamScanner

मराठी दैनिक
लोकजन

# आर. एम. पटेल महाविद्यालय येथे स्विप कार्यक्रम अंतर्गत रांगोळी स्पर्धा



भंडारा :- स्थानिक आर. एम. पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ स्वीप कार्यक्रम अंतर्गत रांगोळी स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनानुसार रासेयो विभाग व गृहअर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.वरील कार्यक्रमात एकूण २० विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, तहसिदलदार अक्षय पोयाम, नायब तहसिलदार अनिता गावंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे, प्रा. श्वेता वेगड, प्रा. नंदेश्वर, कु. प्रिती बुरडे, कु. नेहा शेलारे, प्रियंका लेंडे, प्रिती भेंदे, उमा मेंढे, मयुरी, शालू शेंडे, सोनाली क्षिरसागर, वैशाली गायधने, मिनाक्षी बाळबुधे यांनी प्रयत्न केले.

Scanned with CamScanner

www.tarunbharat.net
तरुण भारत

# रांगोळीतून 'वोट फॉर बेटर इंडिया'चा संदेश

पटेल महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपवार यांच्या मार्गदर्शनात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात २० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. यात प्रत्येक नागरिकांनी आपल्याला मिळालेले अधिकार मतदानाच्या रूपाने बजावावा व लोकशाहीला बळकट करावे, मतदानापासून नागरिकांनी वंचित राहू नये म्हणून रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून मतदारांना आवाहन करणारे संदेश देण्यात आले. यात 'वोट डालने को जाना है, अपना फर्ज निभाना है, मतदान हमारा अधिकार है,' 'गीव्ह वोट, प्राऊड टू बी व्होटर, माय व्होट माय राईट, वोट फॉर बेटर इंडिया' यासह मतदारांना आवाहन करणारे विविध संदेश रांगोळीतून साकारण्यात आले.



मतदान जनजागृतिपर रांगोळी काढताना विद्यार्थिनी

लोकशाही मतदान प्रक्रियेने बळकट करता येते, असे आवाहन करण्यात आले. मतदान आपल्याला मिळालेले अधिकार आहे आणि तो आपण अवश्य बजावावा यासह विविध संदेशांनी आवाहन करण्यात आले. रांगोळीच्या माध्यमातून साकारण्यात आलेले संदेश हे नागरिकांना आकर्षित करणारे ठरले. याशिवाय भंडारा-पवनी विधानसभा क्षेत्रातील शाळा, महाविद्यालयात रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सहाय्याने नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने मतदानासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

या विधानसभा क्षेत्रात स्विप कार्यक्रमातून मतदानाची व्यापक जनजागृती होऊन मतदानाची आकडेवारी वाढावी, एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये म्हणून उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय पोयाम व स्विपचे नोडल अधिकारी अनिता झाडे यांनी आवाहन केले. ◂(*तभा वृत्तसेवा*)

Scanned with CamScanner

लोकमत शनिवार, दि. २८ सप्टेंबर २०१९ ३

# रांगोळीतून 'वोट फॉर बेटर इंडिया' चा दिला संदेश

## मतदान जागृती : आर. एम. पटेल महाविद्यालय

लोकमत न्यूज नेटवर्क

भंडारा : नागरिकांनी लोकशाहीला बळकट करण्यासाठी विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजवावा यासाठी आर. एम. पटेल महाविद्यालयात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून 'वोट फॉर बेटर इंडिया' चा संदेश देण्यात आला.

भंडारा विधानसभा क्षेत्रा अंतर्गत शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत आदी ठिकाणी स्विप अंतर्गत मतदार जनजागृती करण्यात येत आहे. आर. एम. पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व गृह अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेचे आयोजन प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. यात २० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. मतदानापासून नागरिकांनी वंचित राहू नये याकरिता मतदारांना आवाहन करण्यात आले. यामध्ये वोट डालने को जाना है, अपना फर्ज निभाना है, मतदान हमारा अधिकार है, गिव्ह वोट, प्राऊड टू बी व्होटर, माय व्होट माय राईट, व्होट फार बेटर इंडीया यासह



जनजागृतीसाठी रांगोळी साकारताना विद्यार्थीनी.

रांगोळीतून विविध संदेश साकारण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, सहायक निवडणूक अधिकारी अक्षय पोयाम, अनिता झाडे यांनी मतदानाचे आवाहन केले.

Scanned with CamScanner

सकाळ | भंडारा    शनिवार, २८ सप्टेंबर २०१९
TODAY

# रांगोळीतून 'व्होट फॉर बेटर इंडिया'चा संदेश

## मतदारांना केले रांगोळी स्पर्धेतून आवाहन; स्विप कार्यक्रमाची आर. एम. पटेल कॉलेजमध्ये जनजागृती

सकाळ वृत्तसेवा

भंडारा, ता. २७ : नागरिकांनी विधानसभा निवडणुकीमध्ये लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावावा. याकरिता आर. एम. पटेल महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून 'व्होट डालने को जाना है, अपना फर्ज निभाना है; मतदान हमारा अधिकार है, व्होट फॉर बेटर इंडिया' असे संदेश साकारून मतदानाविषयी जनजागृती केली.

भंडारा विधानसभा क्षेत्रांतर्गत शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत व विविध ठिकाणी स्विप कार्यक्रमांतर्गत मतदानासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. २६ सप्टेंबरला भंडारा येथील आर. एम. पटेल महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व गृह अर्थशास्त्र विभागातर्फे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यात महाविद्यालयाच्या २० विद्यार्थिनींचा सहभाग होता. यामध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये प्रत्येक नागरिकांनी आपल्याला मिळालेले अधिकार मतदानाच्या रूपाने बजावावा व लोकशाहीला बळकट करावे, मतदानापासून नागरिकांनी वंचित राहू नये, याकरिता रांगोळी स्पर्धेचा माध्यमातून मतदारांना आवाहन करणारे संदेश देण्यात आले. यामध्ये 'व्होट डालने को जाना है, अपना फर्ज निभाना है; मतदान हमारा अधिकार है, गीव्ह व्होट, प्राऊड टू बी व्होटर, माय व्होट माय राइट, व्होट फॉर बेटर इंडिया' यासह मतदारांना आवाहन करणारे विविध संदेश रांगोळीतून साकारण्यात आले.

महाविद्यालयात घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून मतदारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यात आली. लोकशाही

येते, असे आवाहन करण्यात आले. मतदान आपल्याला मिळालेले अधिकार आहे. आणि तो आपण अवश्य बजावावा. यासह विविध संदेशांनी आवाहन करण्यात आले. रांगोळीच्या माध्यमातून मतदारांकरिता साकारण्यात आलेले संदेश हे नागरिकांना आकर्षित करणारे ठरले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत या स्पर्धेच्या माध्यमातून मतदानाची जनजागृती प्रभावशील ठरली आहे. आर. एम. पटेल महाविद्यालयासोबतच भंडारा-पवनी विधानसभा क्षेत्रातील शाळा, महाविद्यालयांमध्ये रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या साहाय्याने नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने मतदानासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे. या विधानसभा क्षेत्रामध्ये स्विप कार्यक्रमातून मतदानाची व्यापक जनजागृती होऊन मतदानाची आकडेवारी वाढावी. एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये,



भंडारा : स्पर्धेत सहभागी होऊन रांगोळी काढताना विद्यार्थिनी.

तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, सहाय्यक ... व स्विपचे नोडल अधिकारी अनिता झाडे यांनी आवाहन केले

# रेवाबेन पटेल महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम

भंडारा, ता. ३ : श्रीमती आर.एम. पटेल महाविद्यालयात रासेयो विभाग व आजीवन अध्ययन केंद्र विभाग यांच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मागदर्शनात घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मधुलता व्यास होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अ.भा. अंनिसचे जिल्हा सचिव मूलचंद कुकडे, जिल्हा उपाध्यक्ष रत्नाकर तिडके उपस्थित होते.

अंधश्रद्धा एक सामाजिक समस्या या विषयावर मूलचंद कुकडे यांनी प्रकाश टाकला. अनेक भोंदू साधू श्रद्धेच्या नावाखाली खोटी आश्वासने देऊन समाजातील लोकांना लूटत असतात. यासाठी चिकित्सक बुद्धी प्रामाण्यवादी झाले पाहिजे. असे, श्री. कुकडे म्हणाले. त्याचप्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन कायदा या विषयावर रत्नाकर तिडके यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक रासेयो अधिकारी प्रा. किशोदत्त पाखमोडे यांनी केले. आभार सहकार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता वेगड यांनी मानले.

आयोजनाकरिता प्रा. डॉ. राहुल भोरे, प्रा. नरेश बोरकर, प्रा. आरती देशपांडे, शिल्पा जगनाडे, आचल गायधने, संजना टेंभूर्णे, प्रणाली साखरकर, तेजस्वीनी नागरे, श्वेता झंझाड, कांचन झंझाड यांनी सहकार्य केले. २१ म्हाट 4/10/2019




**स्वच्छता अभियान :–** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने व भंडारा येथील श्रीमती आर.एम. पटेल महाविद्यालयाचे वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या निमित्ताने शहरातून रॅली काढून स्वच्छतेचा संदेश देत महात्मा गांधींना अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रॅली दरम्यान परिसरातील केरकचरा उचलून गोळा केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकगण सहभागी झाले होते. महाभूमि 4/10/2019

Scanned with CamScanner

देशोन्नती भंडारा

भंडारा २
शनिवार, दि.५ ऑक्टोबर २०१९

# आर.एम.पटेल महाविद्यालय,भंडारा



प्रतिनिधी / ४ ऑक्टोबर

भंडारा : श्री.आर.एम.पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे २ ऑक्टोबर राष्ट्रपिता मा.गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.राहुल भोरे हे होते.तसेच मार्गदर्शक डॉ.रंजना शृंगारपूर, प्रमुख अतिथी मराठी विभाग प्रा.आरती देशपांडे, समाजशास्त्र विभाग प्रा.ज्ञानेश घरडे, प्रा. किशोरदत्त पाखमोडे, प्रा. डॉ.श्वेता वेगड आदी उपस्थित होते. यावेळी स्वच्छता अभियान मतदान जनजागृती तसेच प्लास्टिक निर्मूलनासाठी सिक्लील लाईन्त तथा महाविद्यालय परिसरात रॅली काढून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले व प्लास्टिक दूर करुया, पर्यावरण वाचवू या, प्लास्टिक हटावो धरती बचावो असे नारे देण्यात आले. यावेळी शिल्पा जगनाडे, श्रध्दा खोब्रागडे, संजना टेमुर्णे, आचल कामथे, स्वार्थी बडवाईक यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनावर आधारीत भाषणे दिलीत. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.राहुल भोरे, प्रा.डॉ.श्वेता वेगड, प्रा.आरती देशपांडे यांनी जागतिक अहिंसा दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोरदत्त पाखमोडे यांनी केले तर संचालन हर्षा झंझाड हिने तर आभार प्रदर्शन श्रध्दा खोब्रागडे हिने मानले.यावेळी प्राजक्ता महामे, नेहा सदेले, दुर्गा गाढवे, रक्षा शहारे, प्रियंका पटले, रुपाली मंदुरकर इत्यादी उपस्थित होते.

भंडारा ४
शुक्रवार, दि.४ ऑक्टोबर २०१९

# आर.एम.पटेल विद्यालयात रासेयो सप्ताह




प्रतिनिधी / ३ ऑक्टोबर

भंडारा : श्रीमती आर.एम.पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोरि २०१९ पर्यंत रासेयो सप्ताह साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रंजना शृंगारपूरे हे होते तसेच प्रमुख पाहुणे प्रा.शिरीष नखाते, कार्यक्रम अधिकारी रासेयो प्रा.किशोरदत्त पाखमोडे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता वेगड उपस्थित होते: यावेळी शिल्पा जगनाडे, आरती हेडावू यांनी रासेयो बद्दल आपले मनोगत मांडले तसेच महाविद्यालयात स्वच्छता अभियान, सामाजिक प्रबोधनात्मक पथनाट्य दाखविण्यात आले. दि. २५ सप्टेंबर ला महात्मा गांधी व्यक्ती आणि विचार यावर परिसंवाद घेण्यात आला. दि. २८ सप्टेंबर ला राष्ट्रपिता मा.गांधी यांचे सामाजिक विचार यावर व्याख्यान घेण्यात आले. यावेळी अध्यक्ष प्रा.डॉ.गोवर्धन घोटे हे होते. दि. १ ऑक्टोबर ला तरुणांची वाढती व्यसनधिनता या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. दि. २ ऑक्टोबर ला राष्ट्रपिता मा.गांधी व शास्त्री यांची जयंती जागतिक अहिंसा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष प्रा.डॉ.राहुल भोरे हे होते. या कार्यक्रमांतर्गत प्रबोधनात्मक रॅली काढण्यात आली. यावेळी विधानसभा निवडणूक, प्लास्टिक निर्मूलन, स्वच्छतेचे महत्व अशी नारेबाजी करण्यात आली. यावेळी उमा मेंढे, तेजस्विनी नागरे, श्रध्दा खोब्रागडे, आचल कामथे, स्नेहा शेलारे, प्रणाली खोब्रागडे, प्रिती बुरडे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# आर. एम. पटेल महाविद्यालय येथे रासेयो सप्ताह

भंडारा :– श्रीमती आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०१९ राष्ट्रीय सेवा योजना सप्हात निमित्त परिवसंवादाचे आयोजन करण्यांत आले. वरील कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. गोवर्धन धोटे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. शिरीष नखाते, प्रा. डॉ. कैलाश ईश्वरकर व्यासपीठावर उपस्थित होते.



कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रपिता महात्मा गांधी सामजिक विचार या विषयावर कु. प्रियंका पटले, कु. शिवानी ढोरे, कु. मयुरी तरारे यांनी आपले विचार व्यक्त केले.

त्याचप्रमाणे प्रमुख अतिथी प्रा. डॉ. शिरीष नखाते, प्रा. डॉ. कैलाश ईश्वरकर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सामाजिक विचार या विषयावर भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो अधिकारी प्रा. किशोरदत्त पाखमोडे यांनी केले तर आंभार प्रदर्शन कु. मिनाक्षी बाळबुधे हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. आरती हेडावू, कु. उमा मेंढे, कु प्रिती बुरडे, प्रणाली खोब्रागडे यांनी अथक परिश्रम केले.

Scanned with CamScanner

# आर.एम.पटेल कॉलेज मध्ये जागतिक अहिंसा दिन साजरा

**भंडारा :** स्थानिक श्रीमती आर.एम.पटेल महिला महाविद्यालय भंडारा येथे २ ऑक्टोबर ला राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लाल बहादूरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंजना शृंगारपुरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.डॉ.राहुल भोरे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागातील प्रा.आरती देशपांडे, प्रा.ज्ञनेश घरडे समाजशास्त्र विभाग, प्रा.किशोरदत्त पाखमोडे, प्रा.डॉ.श्वेता वेगड कार्यक्रम अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

जागतिक अहिंसा दिन कार्यक्रमाचे औचित्य साधून स्वच्छता अभियान मतदान जनजागृती प्लास्टिक निर्मूलनासाठी सिव्हील लाईन तथा महाविद्यालया परिसरांत रॅली काढून स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले. प्लास्टिक दूर करू या, पर्यावरण वाचवू या, प्लास्टिक हटावो, धरती बचावो असे नारे देण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर कु.शिल्पा जगनाडे, श्रध्दा खोब्रागडे, संजना टेंभुर्णे, आचल कामथे, स्वार्थी बडवाईक यांनी भाषणे दिली. मा.अध्यक्ष प्रा.डॉ.राहुल भोरे, प्रा.डॉ.श्वेता वेगड, प्रा.आरती देशपांडे यांनी जागतिक अहिंसा दिन, अहिंसेचे महत्व, स्वच्छतेचे महत्व, प्लास्टिक निर्मूलन काळाची गरज ग़ावर अभ्यासपूर्ण मत व्यक्त केलीत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी किशोरदत्त पाखमोडे, संचालन कु.हर्षा झंझाड तर आभारप्रदर्शन कु.श्रध्दा खोब्रागडे हिने केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कु.प्राजक्ता मडामे, नेहा सदेले, दुर्गा गाढवे, रक्षा शहारे, प्रियंका पटले, रूपाली मंदुरकर यांनी परिश्रम घेतले.

सकाळ अॅग्रो वन
सर्व पेपरवाल्यांकडे उपलब्ध.

Scanned with CamScanner

लोकमत मंगळवार, दि. १७ मार्च २०२० २

# भंडारात एचआयव्ही जनजागृती उपक्रम




भंडारा : येथील आर. एम. पटेल महाविद्यालयाच्या रासेयो विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने युवा वर्गात एचआयव्ही जनजागृती उपक्रम पटेल महाविद्यालयात राबविण्यात आला. अध्यक्षस्थानी सामान्य रुग्णालयाचे आयसीटीसी चे समूपदेशक सुरेश ठाकरे होते. यावेळी रतना भुजाडे, चंदा शेंडे उपस्थित होते. यासोबतच मान्यवरांच्या हस्ते एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार रेड रिबन क्लबचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी या क्लबचे ध्येय उद्दिष्ट कार्य व जबाबदारी सांगण्यात आली. प्रास्ताविक मनोज येरणे यांनी केले. संचालन प्रा. डॉ. श्वेता वेगड, तर आभार प्रदर्शन प्रा. नरेश बोरकर यांनी केले. प्रश्नोत्तर कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थीनी गायत्री ठाकरे, रागीनी धकाते, उमा मेंढे, प्राची बांते, नेहा कटारे, प्रणाली साखरकर, नेहा कुंभारे, निशा जुंबळे यांनी सहकार्य केले.

भंडारा ४
मंगळवार, दि. १७ मार्च २०२०

# आर.एम.पटेल महाविद्यालयात एच.आय.व्ही.जनजागृती

**भंडारा ■ प्रतिनिधी**

स्थानिक रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय व श्रीमती आर.एम.पटेल महाविद्यालय रासेयो विभाग तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने युवा वर्गात एच.आय.व्ही.जनजागृती व्हावी याकरीता कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.रंजना शृंगारपूरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामान्य रुग्णालय भंडाराचे आयसीटीसी समुपदेशक सुरेश ठाकरे, समुपदेशक रतना भुजाडे, सिकान्सेल विभागातील चंदा शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश ठाकरे यांनी युवा वर्गांनी एच.आय.व्ही. तपासणी केली पाहिजे तसेच समाजामध्ये जनजागृती करावी असे प्रतिपादन केले तसेच अन्य मान्यवरांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार रेड रिबन क्लबचे उद्घाटन करुन या क्लबचे ध्येय, उदिष्ट्ये कार्य व जबाबदारी सांगण्यात आली. यावेळी आयोजित प्रश्नोत्तर कार्यक्रमात गायत्री ठाकरे, रागिणी धकाते, उमा मेंढे, प्राची बांते, नेहा कटारे, प्रणाली साखरकर, नेहा कुंभारे, निशा जुमळे आदींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज येरणे यांनी केले तर संचालन प्रा.डॉ.श्वेता वेगड व आभार प्रा.नरेश बोरकर यांनी केले.

Scanned with CamScanner

# श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महाविद्यालयात जागतिक महिला दिन

**भंडारा ■ प्रतिनिधी**

स्थानिक श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय भंडारा येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम घेण्यात आला.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रंजना शृंगारपुर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.डॉ. श्वेता वेगड यांनी भूषविले. व्यासपीठावर प्रा. आरती देशपांडे, प्रा. डॉ. अनिता जयस्वाल, प्रा. सुनिता शेंडे, वर्षा मेश्राम उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून जागतिक महिला दिन या विषयांवर रागीनी धकाते, करूणा सावतवान, प्रणाली खोब्रागडे, आरती हेडावू यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अनिता जयस्वाल, प्रा. सुनिता शेंडे तर आभार प्रदर्शन प्रा. सुनिता शेंडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रणाली साखरकर, शिल्पा जगनाडे, हर्षा झंझाड, प्रतिक्षा बान्ते, शृतिका खोब्रागडे, पायल मते यांनी सहकार्य केले.

आभार प्रदर्शन ठोरकर यांनी केले.

## आर. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा

भंडारा : येथील रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला महाविद्यालयात महिला दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्वेता वेगळ होत्या. प्राचार्य रंजना श्रृंगारपुरे यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यक्रमाला प्रा. आरती देशपांडे,प्रा. डॉ. अनिता जयस्वाल, प्रा. सुनीता शेंडे, वर्षा मेश्राम, उपस्थित होत्या. यावेळी रागीनी धकाते, करुणा सावतवाण, प्रणाली खोब्रागडे, आरती हेडाऊ यांनी विचार व्यक्त केले. संचालन प्रा. डॉ. अनिता जयस्वाल, प्रा. सुनीता शेंडे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रणाली साखरकर, शिल्पा जगनाडे, हर्षा झंझाड, प्रतीक्षा बांते, श्रृतीका खोब्रागडे, पायल मते यांनी सहकार्य केले.

Scanned with CamScanner




महाविद्यालयात व्यसनमुक्ती जागृती शपथ घेतांना प्राध्यापकवृंद




५ सप्टेंबर शिक्षक दिन मार्गदर्शन करतांना
प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपूरे

Scanned with CamScanner




'गर्ल्स चाइल्ड डे' या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपुरे व्यासपीठावर डॉ. भोरे, डॉ. वेगड




मतदान विषयी शपथ घेतांना प्राध्यापक वृंद व विद्यार्थिनी

Scanned with CamScanner




बक्षिस वितरण करतांना प्राचार्य डॉ. रंजना शेंगारपुरे सोबत कार्यक्रम अधिकारी डॉ. श्वेता वेगड, प्रा. आरती देशपांडे कु. वर्षा मेश्राम




रेड रिबन क्लब उद्घाटन प्रसंगी बोलतांना श्री ठाकरे

Scanned with CamScanner